# ई - पोलीस पत्रिका

दि.२४/०२/२०२३ अनु.क्र.३९

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१.पोआअ/आस्था-४/BDDS BASIC/१६४१ /२०२३ अमरावती शहर दिनांक २३/०२/२०२३**

संदर्भ :- १. उप संचालक,प्रशिक्षण महाराष्ट्र गुप्तावार्ता प्रबोधिनी,पुणे यांचे बिनतारी संदेश क्र MIA/TRG/ BDDS BASIC ०२/२०२३/४१२,दि.१६.०२.२०२३

विषय :- महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे येथे आयोजीत BDDS BASIC कोर्स करीता पोलीस अंमलदार यांना पाठविणे बाबत.

*****

उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन, **महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधीनी, एसआरपीएफ-१ कॅम्पस, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे दिनांक २७.०२.२०२३ ते ०९.०३.२०२३** या कालावधीत **BDDS BASIC संदर्भातील प्रशिक्षण** आयोजीत करण्यात येणार असुन त्याकरीता या कार्यालयाच्या आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/बक्कल क्रमांक/नाव | नेमणुक |
|---|---|---|
| ०१ | चालक सपोउपनि/६१, प्रमोद मडावी | बॉम्ब शोध व नाशक पथक, अमरावती शहर. |

वरील प्रमाणे निवड करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांनी सदर प्रशिक्षणाकरीता दिनांक २६.०२.२०२३ रोजी २०:०० वाजेपावेतो हजर होतील अशा बेताने ओळखपत्र,कोव्हीड-१९ चे दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र,कुटूंब आरोग्य योजनेचे कार्ड,रिलीव्ह मेमो व आवश्यक त्या किटसह रवाना करुन त्याचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. प्रशिक्षण केंद्रात हजर झाल्यानंतर प्रशिक्षण शुल्काकरीता भरण्यात आलेल्या रकमेची पावती प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर सोबत आणणे अनिवार्य असेल.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना प्रशिक्षणाकरीता नमुद दिनांकास न चुकता रवानगी द्यावी तसेच प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेले जे पोलीस अधिकारी/अंमलदार प्रशिक्षणास गैरहजर राहल्यास किंवा प्रशिक्षण केंद्रात वेळेच्या आत हजर न झाल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच रोखपाल,पोलीस आयुक्त कार्यालय,अमरावती शहर यांनी वर नमुद पोलीस अंमलदार यांना रुपये ३,२६०/- (अक्षरी रुपये तिन हजार दोनशे साठ फक्त) इतकी रक्कम प्रशिक्षण शुल्क म्हणुन प्रशिक्षण निधीतुन रोखीने अदा करावी.

**२.पोआअ/आस्था-वेनिलि/मपोना-पवार ब.क्र.१३१४/१५५५/२०२३ अमरावती शहर दिनांक २३/०२/२०२३**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. पोआअश/प्रलि-आस्था/अधिसंख्य पदे/११७६/२०२३,
दिनांक १०.०२.२०२३

# आदेश

**मपोना/१३१४, उज्वला प्रल्हादराव पवार, नेमणूक पोलीस ठाणे सिटी कोतवाली, अमरावती शहर** यांनी त्यांची जात ठाकुर/अ.जमाती चे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९ मधील तरतुदीनुसार त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-प्रलि/मा.स.न्या.सि.अ.क्र.८९२८-२०१५/२३१/२०२०, दिनांक ०९.०१.२०२० अन्वये ११ महिण्याकरीता अथवा ते सेवेत राहीले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्याने त्यांना जुलै-२०२०,जुलै-२०२१ तसेच जुलै-२०२२ ची वेतनवाढ अदा करण्यात आलेली नाही.

**मपोना/१३१४, उज्वला पवार** यांनी अनुसुचीत जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,अमरावती, विभाग अमरावती यांचे कडील प्रकरण क्र.५/५०३/ser/२०८७७२, दिनांक ३०.०१.२०२३ नुसार ठाकुर/अनुसुचीत जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याने त्यांना संदर्भीय आदेशाचे अनुषंगाने मुळ/नियमीत पदावर पोलीस नाईक पदी वर्ग करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने **मपोना/१३१४, उज्वला प्रल्हादराव पवार,** यांची शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** |
|---|---|---|---|
| ०१/०७/२०१९ | रु.३८६००/- एस-८ | ०१/०७/२०१९ | रु.३८६००/- एस-८ |
| ०१/०७/२०२० | रु.३८६००/- एस-८<br>**अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्याने वेतनवाढ देय नाही.** | **०१/०७/२०२०** | **रु.३९८००/- एस-८**<br>**अधिसंख्य पदावरुन मुळ/नियमीत पदावर वर्ग करण्यात आल्याने वेतनवाढ देय.** |
| ०१/०७/२०२१ | रु.३८६००/- एस-८ | **०१/०७/२०२१** | **रु.४१०००/- एस-८**<br>**अधिसंख्य पदावरुन मुळ/नियमीत पदावर वर्ग करण्यात आल्याने वेतनवाढ देय.** |
| ०१/०७/२०२२ | रु.३८६००/- एस-८ | **०१/०७/२०२२** | **रु.४२२००/- एस-८**<br>**अधिसंख्य पदावरुन मुळ/नियमीत पदावर वर्ग करण्यात आल्याने वेतनवाढ देय.** |

**३.पोआअ/आस्था५/श्वॉन दंश रजा/१५१६/२०२३ अमरावती शहर दिनांक २१/०२/२०२३**

**<u>आदेश</u>**

**पोशि**/११९३, आकाश पवार, नेमणुक जलद प्रतिसाद पथक यांना दि.२०/१०/२०२२ ला श्वॉन दंश झ ााल्याने (कुत्रा चावल्याने) श्वॉन दंशावर उपचाराकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९ (१४)(आय) आणि महाराष्ट्र पोलीस निमावली भाग-१ मधील नियम २७३ (ड) तरतुदिनुसार वैद्यकीय प्रमाण पत्राच्या आधारे त्यांना दि. २१/१०/२०२२ ते दि.२८/१०/२०२२ पर्यत एकूण ८ दिवस विशेष नैमितीक रजा (जी रजा खात्यावर खर्ची टाकली जाणार नाही ) मंजुर करण्यात येत आहे.

**४.पोआअ/आस्था ५ /विपश्यना-१५०/१५५६/२०२३ अमरावती शहर दिनांक २२/०२/२०२३**

**आदेश**

पोना/१५० राजेश म.पवार ,नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांची विपश्यना ध्यान सांधना केंद्र लुंबीनी, मोगरा, पो.भानखेड, ता.जि.अमरावती येथे दिनांक २२/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३ या कालावधीत होणाऱ्या शिबिराकरीता निवड झाली असल्याने त्यांना त्यांच्या विनंतीनुसार, शासन निर्णय वित्त विभाग , क्र.आरजा २४०२/२७/सेवा-८, दिनांक २७/६/२००३ चे तरतुदी नुसार त्यांना दिनांक २२/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३ पर्यंत १२ दिवस परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

**५.पोआअ/आस्था ५ /सिक कालावधी/१६४६/२०२३ अमरावती शहर दिनांक २३/०२/२०२३**

**आदेश**

खालील महिला पोलीस अंमलदार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये आजाराचे कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थित होते. सदर पोलीस अंमलदार यांना दिनांक २३.०२.२०२३ रोजी कर्तव्यावर हजर करण्यात येत असून, त्यांचा रुगणनिवेदन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम/ ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी | प्राधिकार |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/५४२, विशाल बुंदेले | पोलीस मुख्यालय | दि.१३/१२/२०२२ ते दि.२३/२/२०२३ पर्यत ७३ दिवस अर्जित रजा मंजुर | रजा नियम ५० नुसार |

सदर पोलीस अंमलदार यांना आजाराच्या कारणास्वत हलक्या स्वरुपाचे कर्तव्य देण्यात यावे.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस